# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 14-00]

**MARATHI SHORTHAND**

(100 Words Per Minute)

Marks : 100

**(Time allowed for Transcription of (A) and (B) passages : 2 Hr.)**

**मराठी लघुलेखन**

[१०० शब्द प्रति मिनिट]

गुण : १००

**[कालावधी – [अ] आणि [ब] उताऱ्यांचे लिप्यांतर करण्यासाठी २ तास]**

---

**[अ]** **[गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]**

या समारंभासाठी आठवण ठेऊन आपण मला इतक्या दूर बोलावले त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. काही वर्षापूर्वी पुण्याला आलो / असताना या कृषि महाविद्यालयाला मी धावती भेट दिलेली होती. यानंतर आपल्या महाविद्यालयाने पुष्कळ प्रगती केलेली आहे. म्हणून ह्या // महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या उद्‌घाटन समारंभाचे निमंत्रण जेव्हा आपण मला दिले तेव्हा ते स्विकारण्याचा मला मोह झाला. या निमित्ताने पुण्याला /// येऊन आपणा सर्वांना भेटण्याची मला पुन्हा एक संधी मिळेल याचा मला फार आनंद झाला. त्याचबरोबर येथील नवीन मतप्रवाहांचा //१// थोडासा अभ्यास करता येईल हेही निमंत्रण स्विकारण्या मागचे कारण आहे हे मी नम्रपणे नमूद करु इच्छितो. मला एक गोष्टीचा अभिमानाने उल्लेख / करावासा वाटतो तो हा की, या महाविद्यालयाच्या विस्तारीकरणामध्ये आपल्या सर्वांचा खूप मोटा वाटा आहे. आपली इच्छाशक्ती प्रबळ // असल्यानेच हे घडू शकले असे मी मानतो. विकास ही काही एकाच क्षेत्रापुरती मर्यादित गोष्ट नसून ती सर्वकष अशी बाब आहे. एकाच क्षेत्रामध्ये प्रगती झाली /// म्हणजे विकास होतो असे नाही. सर्व क्षेत्रांमध्ये संतुलित प्रगती म्हणजे विकास अशी विकासाची व्याख्या मी करतो आणि म्हणून काही मूलभूत प्रयत्नांची विकासासाठी //२// आवश्यकता असते. या दृष्टीने पाहिले तर महाराष्ट्राच्या विकासामध्ये कृषि-प्रशिक्षणाची आणि शेती विषयक सखोल ज्ञानाची आवश्यकता होती. त्यासाठीच हे कृषि / महाविद्यालय आता विस्तार पावत आहे. या कृषि महाविद्यालयाला आपण आता मोठे थोरले घर देतो आहोत आणि निश्चितच त्याचा येणाऱ्या पिढीला फायदा // होईल यात शंका नाही.

कृषि महाविद्यालयची आता एक निराळी वसाहत स्थापन होणार असून जमिनीची किंमत धरून जवळजवळ नव्वद लाखांचा खर्च /// या महाविद्यालयासाठी आपण करतो आहोत. लाखांचा प्रश्न मी गौण मानतो, परंतु हे जे काम होत आहे ते अतिशय महत्त्वाचे असे काम //३// आहे. तेव्हा मला आशा आहे की या महाविद्यालयामध्ये शिकणारे विद्यार्थी काही नवीन परंपरांची यात भर घालतील.

मी सांगितले की, हा उपक्रम अनेक / वर्षानंतर फलद्रुप होतो आहे, त्यामुळे सर्वांवर आता अनेक मोठ्या जबाबदाऱ्या येऊन पडणार आहेत. त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. // ह्या महाविद्यालयात आता बाहेरगावाहून अनेक विद्यार्थी येतील. त्यांच्या निवासाची, अभ्यासाची सोय येथे होईल अशा विद्यार्थ्यांवरही ह्या महाविद्यालयाची /// कीर्ति वाढविण्याची जबाबदारी आहे. भविष्यात त्यांना आपल्या स्वत:बरोबरच ह्या परिसराचे नाव उज्ज्वल करावयाचे आहे हे त्यांनी विसरता कामा नये. //४//

**[दोन मिनिटांचे मध्यांतर]**

---

[ब] [गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]

लघुलेखन ही एक कला आहे. सन अठराशे सदतीस मध्ये सर आयझॅक पिटमन् यांनी ह्या लिपीचा शोध लावला. उच्चारशास्त्रावर / आधारित ही लिपी असल्याने सुरुवातीला तिला "फोनोग्राफी" असे संबोधण्यात येत होते. आजपर्यंत सर्व जगभर ह्या लिपीचा प्रसार झालेला आहे. // मुख्यत: कार्यालयीन कामातील पत्रलेखन, सभांचे वृत्तांत लेखन इत्यादि कामांसाठी तिवा वापर केला जातो. ह्याशिवाय आपले महत्त्वाचे लेखन /// गोपनीय रहावे यासाठीही काही ठिकाणी याचा वापर केला जातो.

भूमितीतील निरनिराळ्या कोनातून काढलेल्या सरळ रेषा, वर्तुळांचे निरनिराळे भाग, जाड आकृत्या //१// पातळ आकृत्या, लहान-मोठ्या आकृत्या, बिंदू, टिंबे यांच्या आधारे यांचे लेखन व वाचन केले जाते. लघुलेखनाच्या अभ्यासक्रमात यावर आधारित / निरनिराळे पाठ समजावून घेऊन ही कला आत्मसात करण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. कारण संकेताकृती कशा लिहावयाच्या याचे ज्ञान झाले तरी वारंवार // त्या गिरवून त्यावर प्रभुत्व मिळविणे ही एक अवघड गोष्ट आहे. कित्येक विद्यार्थी सुरुवातीच्या टप्प्यात मोठ्या जोमाने सर्व अभ्यासक्रम पूर्ण करतात ही, /// परंतु त्यानंतर जी अथक मेहनत घ्यावी लागते त्यात कमी पडतात. प्रसंगी इतर जबाबदाऱ्या संभाळताना ते लघुलेखनाच्या ह्या कलेकडे पाठ फिरवितात. //२// कित्येकांचा समज असा आही की, लघुलेखन शिकताना भाषेवर प्रभुत्व हे असलेच पाहिजे, हे म्हणजे पन्नास टक्के सत्य आहे. कारण लघुलेखनासाठी / विद्यार्थ्याला भाषेच्या व्याकरणाचे ज्ञान असले पाहिजे, परंतु त्यासाठी भाषापंडित असण्याचे कारण नाही. ह्याउलट असे म्हणता येईल की, // लघुलेखनामुळे विद्यार्थ्याला भाषेची गोडी लागते आणि त्याचा शब्दसंग्रह वाढल्याने तो काही काळाने स्वत: उत्तमोत्तम शब्द आणि /// वाक्प्रचारांचा वापर करुन पत्रलेखनात तरबेज होऊ शकतो.

लघुलेखनासाठी उत्तम शिक्षक अथवा मार्गदर्शन मिळणे आजकाल दुरापास्त होत चालले आहे. याचे मुख्य //३// कारण म्हणजे इतर विषयांतील शिक्षक त्यांच्या विषयात निष्णात झाल्यानंतर ते ज्ञान अखंडपणे त्यांच्या शिष्यांना देत रहातात. परंतु उत्तम / लघुलेखकाला स्वीय सहाय्यक, उच्च अधिकारी इत्यादि पदे प्राप्त झाल्यानंतर तो लघुलेखनात रस घेईनासा होतो आणि ही कला त्याच्या बरोबरच // लुप्त होते. परंतु उत्तम मार्गदर्शकाला अभ्यासू विद्यार्थी मिळाल्यानंतर आणि त्यांनी ही कला आत्मसात करुन चांगल्या नोकऱ्या मिळविल्यानंतर होणारा आनंद अवर्णनीय /// असा असतो. प्रशिक्षित लघुलेखकाचे वेतन उच्च दर्जाचे असते. स्पर्धा कमी असल्याने लघुलेखनाच्या कलेकडे तरुण पिढीने अवश्य लक्ष द्यावे. //४//